


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६९५. वा | शुक्रवार | दि.०१ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# महसूलमधील भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाईसाठी जबरदस्त हालचाली...

## विजय टेकाळे यांच्यावर लवकरच कारवाईचा हतोडा पडणार...

**जनसंचलन/ बुलढाणा**

महसूल विभागातील महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे व त्यांना साथ देण्यासाठी नियमबाह्य काम करणारे काही अधिकारी यांच्यावर लवकरच कारवाईचा बडगा उगारला जाण्याची शक्यात आहे. विजय दत्तात्रय टेकाळे यांच्या भ्रष्टाचारासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज गेल्या अनेक महिन्यांपासून सातत्याने प्रयत्न करीत असून, महसूलमधील भ्रष्टाचाऱ्यांना आतापर्यंत पूर्णपणे संरक्षण मिळत आलेले आहे. परंतु गेल्या काही दिवसांमध्ये महसूल विभागात अंततर्गत सरगर्मी वाढली असून, या भ्रष्ट बहुचर्चित अधिकाऱ्यांवर कारवाईची दाट शक्यता निर्माण झाली आहे. महसूल विभागात केलेल्या आपल्या अनेक वर्षांच्या अत्यंत घाणेरड्या सेवेत मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी भ्रष्टाचाराची इतकी घाण करून ठेवली आहे की, ती आता निस्तरायला खूप श्रम आणि वेळ खर्च करावी लागणार आहे. टेकाळे यांनी बेबंद भ्रष्टाचाराची एक मोठी परंपरा येथे निर्माण करून ठेवली आहे. आपल्या भ्रष्टाचाराला शिष्टाचाराचे अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी त्यांनी एककीडे राजकीय लोकांशी संधान सांधले, तर दुसरीकडे आपल्याच विभागाच्या काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून आपला भ्रष्टाचाराच संपूर्ण कार्यभाग साधला. भ्रष्टाचाराच्या पैशांतून मग टेकाळे यांनी आपल्या करोडो रुपयांचे अवैध संपत्तीचे साम्राज्य उभे केले. यात प्रसंगी अनेक सामान्य नागरिकांची फसवणूक, अडवणूक, लुबाडणूक करण्यात टेकाळे यांच्यासारख्यांना कसलीही लाज-लज्जा, शर्म वाटली नाही. बरं हा संपूर्ण भ्रष्टाचार सुरू असताना टेकाळेंवर कारवाई करण्याची तसदी कोणीही घेतली नाही. टेकाळे यांचा हा राजरोसपणे चालणाऱ्या भ्रष्टाचाराकडे सगळ्या अधिकाऱ्यांनी डोळेझाक केली. ज्यांच्यावर कारवाईची जबाबदारी होती अशा अनेकांनी टेकाळे यांच्यावर कारवाईसाठी वेळकाढूपणा केला आहे. या प्रकारामुळे टेकाळे हे आणखी मस्तवाल झाले व त्यांनी आपली भ्रष्टाचाराची परंपरा पुढेही कायम ठेवली. टेकाळे भ्रष्टाचार करून-करून अत्यंत कोडगे आणि गेंड्याच्या कातडीचे बनले आहेत. तसेच भ्रष्टाचार हा त्यांचा स्थायी भाव बनला आहे. एकीकडे टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराकडे महसूल अधिकाऱ्यांची डोळेझाक तर होतीच, दुसरीकडे वृत्तपत्र असो की इलेक्ट्रॉनिक्स मीडिया कोणीही टेकाळेंच्या भ्रष्टाचाराला हात घालू शकले नाही. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज हे पहिले पहिले वृत्तपत्र आहे ज्याने टेकाळेंच्या भ्रष्टाचाराची लक्तरं बाहेर काढली.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने सुरवातीला बुलढाणा तहसीलदार, एसडीओ किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रयत्न करण्यात आला.तत्कालीन जिल्हाधिकारी तुम्मोड असतांना त्यांच्याकडे टेकाळेंच्या भ्रष्टाचाराचे सगळे पुरावे सादर करण्यात आले होते. तरीही तुम्मोड यांनी राजकीय दबावाला बळी पडून टेकाळेंवर कोणतीही कारवाई केली नाही. टेकाळे यांनी एका लोकप्रतिनिधीशी संधान साधले व त्यांच्याशी अर्थपूर्ण संबंध प्रस्थापित केले. त्यामुळे संबंधित लोकप्रतिनिधी हा टेकाळेंना वाचवण्यासाठी मोठा आटापीटा करीत आहे. त्यामुळेच की काय टेकाळेंची साधी बदली जरी करायची असली तरी त्यासाठी थेट अमरावती महसूल आयुक्तांकडे परवानगी मागण्यात आली. एव्हढी लाचारी आणि एव्हढी हतबलता अधिकाऱ्यांची आमच्या पाहण्यात तरी कधीच आली नव्हती. बुलढाण्यातील महसूल अधिकारी एव्हढे लाचार असल्याचे पाहिल्यानंतर सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने थेट अमरावती महसूल आयुक्त कार्यालयात टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराची माहिती पोहोचवण्यात आली. ते सर्व पाहून महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी देखील चक्रावून गेले. त्यानंतर महसूल आयुक्तांनी लगेच हालचाल करून या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेतली व कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना यासंबंधीचे आदेश पोहोचते करण्यात आले. त्यानंतर बुलढाणा जिल्ह्याच्या महसूल विभागाची यंत्रणा अचानक अॅक्टिव्ह झाली व भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाईसाठी हालचालींना वेग आला. सिटी न्यूज व



दैनिक जनसंचलनला प्राप्त माहितीनुसार महूसल विभागाच्या अधिकाऱ्यांनी महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्यावर लवकरच मोठी कारवाई होणार आहे. ही कारवाई नेमकी कशाप्रकारे होते, यावर दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज पूर्णपणे लक्ष ठेऊन आहे दोषीना तात्काळ निलंबित करणे, टेकाळे यांना शासकीय सेवेतून तात्काळ बडतर्फ करणे व टेकाळे यांची अवैध तसेच बेनामी करोडो रुपयांची संपत्ती ही शासनदरबारी जमा करणे, या मागण्या सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन करीत असून, जोपर्यंत या मागण्या पूर्ण होत नाहीत, तो पर्यंत आम्ही भ्रष्टाचारविरोधातील आमचे मोहीम कदापिही थांबवणार नाही.

अजून बरेच काही पुढील भागात...

# बोराखेडी पोलिस स्टेशन येथे आमदार गायकवाडांसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल...

## राजूर शेतजमीन प्रकरण : न्यायालयाच्या आदेशाने गुन्हा...

**जनसंचलन/बुलढाणा**

बेधडक वक्तव्यांमुळे चर्चेत आलेले बुलढाण्यातील शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड पुन्हा अडचणीत सापडले आहेत. संजय गायकवाड यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गायकवाड यांनी आपली शेतजमीन हडपून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी एका महिलेने पोलिसांत तक्रार नोंदवली होती त्याप्रकरणी गायकवाड तसेच त्यांचा मुलगा मृत्युंजय गायकवाड, सोमनाथ चौबे, दिपाली चौबे आणि ज्ञानेश्वर वाघ यांच्याविरोधातही गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर येथील रीटा उपाध्याय यांनी गायकवाड यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. बुलडाणा जिल्ह्यातील मोताळा तालुक्यातील राजूर गावात त्यांची दीड एकर शेती आहे. आमदार गायकवाड यांनी २०२१मध्ये त्यांच्या शेतजमिनीवर अतिक्रमण केले. तसेच त्या शेतावर अवैधरीत्या फार्महाऊसही बांधले, असा आरोप तक्रारदार महिलेने केला होता. आम्ही जेव्हा त्यावर आक्षेप घेतला, तेव्हा मला जिवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या. तसेच ही शेतजमीन कवडीमोल भावाला विकण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणला गेला. तसं न केल्यास आपल्याला जिवे मारण्यात येईल अशी धमकी गायकवाड आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी दिल्याचा आरोप महिलेने याचिकेत केला होता. त्यानंतर मोताळा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाने गायकवाड यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. गायकवाड व इतर चौघांविरोधात १५६ ( ३ ) नुसार १४३, १५०, ३७९, ३८५, ४४७ आणि ३४ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले. शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड नेहमी वादग्रस्त वक्तव्यांमुळे चर्चेत असतात. शिवजंयतीच्या दिवशी संजय गायकवाड



यांनी स्थानिक वृत्त वाहिनीला मुलाखत दिली. त्या मुलाखातीत आपण १९९७ मध्ये वाघाची शिकार केली होती. त्याच्या दात गळ्यात बांधला आहे. बिबट्या वगैरे तर आपण असेच पळवतो, असे आमदार संजय गायकवाड यांनी म्हटले होते. मात्र त्यामुळे ते पुन्हा वादात सापडले

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन...

**जनसंचलन/ बुलढाणा**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या अधिनस्त अकोला, बुलडाणा व वाशिम या तीन जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, अनुदानित, कायम विना अनुदानित महाविद्यालयांनी सन २०२३-२४ या शैक्षणिक सत्रातील भारत सरकार शिष्यवृत्ती व इतर शिष्यवृत्ती योजनेचे लाभ मिळण्याकरिता नवीन अर्ज, तसेच नुतनीकरण अर्ज भराव्ो, असे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी संकेतस्थळ ऑक्टोबर महिन्यापासून कार्यान्वित झाले आहे. सन २०२३-२४ या शैक्षणिक सत्रामध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे. अकोला, बुलडाणा व वाशिम जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयामध्ये सन २०२३-२४ या शैक्षणिक सत्रामध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शिष्यवृत्ती योजनेचे नवीन अर्ज तथा नुतनीकरण अर्ज तात्काळ mahadbt.maharashtra.gov.in या प्रणालीवर ऑनलाईन भरावे लागणार आहे. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना विहित मुदतीत शिष्यवृत्तीचे अर्ज भरुन महाविद्यालयास सर्व दस्ताऐवज जोडून सादर करावे लागणार आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालय स्तरावरील फलकावर सूचना, तसेच नोटीस देऊन अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळण्यासाठी अवगत करावे. तसेच सन २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षात महाविद्यालयस्तरावरील विविध कारणास्तव प्रलंबित असलेले अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे नवीन अर्ज, तसेच नुतनीकरण अर्ज तात्काळ त्रृटी पुर्तता करुन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला कार्यालयाच्या लॉगीनला मंजूरीसाठी पाठवावे लागणार आहे. विद्यार्थ्यांच्या अर्जाची हार्ड कॉपी महाविद्यालयस्तरावर जतन करुन ठेवण्यात यावी. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी mahadbt.maharashtra.gov.in या प्रणालीवर भारत सरकार पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती आणि इतर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्याकरिता ऑनलाईन अर्ज भरावे, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प प्रकल्प अधिकारी मोहनकुमार व्यवहारे यांनी केले आहे.

## वन्य प्राण्यांचा जयरामगड परिसरात धुमाकूळ वनविभाग झोपेत अन शेतकरी त्रस्त!

**जनसंचलन/ खामगाव**



वन्य प्राणी धुमाकूळ घालत असल्याने शेतातील पिकांचे अतोनात नुकसान होत, असल्याची घटना खामगाव तालुक्यातील जयरामगड परिसरात समोर आली आहे. वनविभाग कार्यालय अंतर्गत शिर्ला नेमाने बीट परिसरातील जयरामगड परिसरात काही दिवसापासून धुमाकूळ घालत असल्याने शेतातील ज्वारी, हरभरा पिकांचे नुकसान होत आहे. निल गाय, रोही, रानडुक्कर,हरीण, इत्यादी वन्य प्राण्यांमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. मात्र याकडे खामगाव वनविभाग दुर्लक्ष करीत आहे. पिकांना वाचवण्यासाठी शेतकरी रात्री शेतात जागरण करत असतो. आधीच शेतकरी अस्मानी संकटांमुळे हवालदिल झाला आहे. आणि त्यातच वन्य प्राण्यांमुळे शेतकरी वैतागुन गेला आहे. वन विभागाने वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी जयराम गड परिसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## वयस्कर, दिव्यांग मतदारांना मतदानासाठी पोस्टल बॅलेट व्यवस्था...

**जनसंचलन/बुलढाणा**

आगामी लोकसभा निवडणुकीत ८० वर्षाहून अधिक वयोवद्ध आणि दिव्यांग मतदारांना मतदानासाठी पोस्टल बॅलेटची व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी त्यांना १२ डी हा फॉर्म भरून द्यावा लागणार आहे. यामुळे या मतदारांना घरूनच मतदान करण्याची सुविधा मिळणार आहे. मतदार यादीमध्ये नाव नोंदविलेले असणाऱ्या ८० वर्षाहून अधिक वय असणारे नागरीक आणि दिव्यांग जे मतदान केंद्रावर येऊ शकत नाही, अशा मतदारांना १२ डी हा फॉर्म भरून देण्याची सुविधा देण्यात आली आहे. मतदान केंद्रावर येऊ शकत नाही, अशा मतदारांनी स्थानिक स्तरावरील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा लागणार आहे. याप्रकारे मतदान करण्यासाठी फॉर्म १२ डी आणि दिव्यांग असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे. जेणेकरून निवडणुकीच्या दिनांकापूर्वी संबंधित निवडणूकीचे अधिकारी घरी येऊन मतदानाची संधी संबंधी दिव्यांग आणि वयस्क मतदारांना पूर्व सूचना देऊन येतील. या सुविधेचा लाभ जे मतदार मतदान केंद्रावर येऊ शकणार नाही, अशा मतदारांनी घ्यावा. तसेच १२ डी फॉर्म भरून देण्याची काळजी घ्यावी. यात अडचणी असल्यास संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचा संपर्क क्रमांक देऊन मदत करण्यात येणार आहे, तसेच अडचण असल्यास १९५०, वोटर हेल्पलाईनवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# गुंगीचे औषध देवून रुग्ण महिलेवर डॉक्टरने केला बलात्कार...

## डॉक्टराविरोधात शिवाजी नगर पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल

**जनसंचलन/ खामगाव**



होमिओपॅथी उपचारासाठी २ महिन्यांपासून नियमित येत असलेल्या विशिष्ट समाजाच्या ३० वर्षीय महिलेला तपासणीच्या नावाखाली गुंगीचे औषध देवून तिच्यावर बलात्कार केल्याची तक्रार पोलिसात दाखल झाली आहे. याबाबत महिलेने दिलेल्या तक्रारीवरून डॉक्टरविरुध्द २८ फेब्रुवारी रोजी शिवाजीनगर पोलिसांनी बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे. स्थानिक घाटपुरी नाक्याजवळ कृष्णा होमिओपॅथीक क्लिनीक हे वात्सल्य हॉस्पिटलमध्ये आहे. या दवाखान्यामध्ये डॉ. प्रशांत भगत प्रॅक्टीस करतात. आकोट येथील विशिष्ट समाजाची ३० वर्षीय महिला गेल्या २ महिन्यापासून डॉक्टर भगत यांच्याकडे उपचारासाठी येत होती. २८ फेब्रुवारी रोजी सदर महिला आपल्या आईसह तपासणीसाठी आली. त्यावेळी डॉक्टरांनी तिला दुपारी तपासणी व उपचार करतो, असे सांगून सदर महिलेला थांबून ठेवले होते. त्यामुळे दुपारी ४ चे सुमारास सदर महिलेला तपासणी कक्षात बोलावून तिला साबुदाण्यासारख्या गोळ्या दिल्या. त्यामुळे काही वेळातच ती बेशुध्द झाली. त्याचवेळी डॉक्टर भगत याने तिच्यावर बलात्कार केला. हा प्रकार सदर महिला शुध्दीवर आल्यानंतर तिच्या लक्षात आला. याबाबत तिने डॉक्टर भगत याला विचारणा केली असता अशाच प्रकारची तपासणी असते, असे म्हणत सदर महिलेला चालते केले, असे तक्रारीत नमूद आहे. घडलेला हा सर्व प्रकार सदर महिलेने शिवाजीनगर पोस्टेला रात्री कथन केला. त्यामुळे शिवाजीनगर पोलिसांनी आरोपी डॉ. प्रशांत भगत विरूध्द कलम ३७६ क, अ नुसार रात्री ११ वाजता गुन्हा दाखल केला. याबाबत अधिक तपास शिवाजीनगर पोस्टेचे पीएसआय खांबलकर करीत आहे.

## बाल विकास कार्यालयाकडून भाडेतत्वावरील वाहनासाठी निविदा आमंत्रित

**जनसंचलन/बुलढाणा**



बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी प्रकल्प कार्यालयाकडून भाडेतत्वावरील वाहनासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प, बुलढाणा (दक्षिण) या कार्यालयासाठी भाडेतत्वावर वाहन घेण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. अटीशर्तीनुसार या कार्यालयासाठी भाडेतत्वावर वाहन घेणेकरीता बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प, बुलढाणा (दक्षिण), एकता नगर, नगर परिषद शाळेसमोर, बुलढाणा येथे दि. ६ मार्च २०२४ पर्यंत परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा, असे आवाहन बाल विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती मं. मा. पांचाळ यांनी केले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तत्काळ सर्वे करून मदत उपलब्ध करून द्यावी - आमदार संजय गायकवाड

## कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना दिलेले निवेदन...

**जनसंचलन/बुलढाणा**

सोमवारी रात्री जिल्हाभरात झालेल्या गारपीट व अवकाळी पावसामुळे बुलडाणा मतदारसंघातील मोताळा व बुलडाणा तालुक्यात शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा तात्काळ सर्वे करण्यात यावा, अशी मागणी आमदार संजय गायकवाड यांनी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, जिल्ह्यातील शेतकरी आधीच मेटाकुटीस आलेला आहे, शेतकऱ्याच्या उत्पादनास भाव नसल्याने तो डबघाईस आलेला आहे, कोरोना काळापासून संकटात अडकलेल्या शेतकरी आता कुठे मोकळा श्वास घेऊ पाहत होता मात्र पर्यावरणाने त्याच्या तोंडी आलेला हा घास सोमवारी रात्री हिरावून घेतला. सोमवारी सायंकाळपासूनच आकाशात दाटून आलेल्या ढगाणे सात वाजेपासून अवकाळी पावसाला सुरुवात झाली. जिल्हाभरात अनेक ठिकाणी गारपीट झाली. सदर अवकाळी पाऊस हा रात्री उशिरापर्यंत सुरूच होता, या अवकाळी पावसामुळे जिल्ह्याभरातील गहू, हरभरा यांचे नुकसान झाले तर दुसरीकडे आंब्याचा मोहोर, पपई, संत्रा मोसंबी, अंगूर या फळबाग उत्पादकास



प्रचंड नुकसान सोसावा लागत आहे. त्यामुळे सदर शेतकऱ्यांचे तत्काळ सर्वेक्षण करण्यात यावे व शासनाच्या वतीने मदत जाहीर करावी अशी मागणी आमदार संजय गायकवाड यांनी केली.

# कौशल्य विकासाचा दिव्यांगांनी लाभ घेण्याचे आवाहन...

**जनसंचलन/बुलडाणा**

प्रमोद महाजन कौशल्य विकास प्रशिक्षणाचा सक्षम दिव्यांगांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र कार्यालयातर्फे जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२३-२४ अंतर्गत किमान कौशल्य विकास कार्यक्रम, ग्रामीण कौशल्य विकास केंद्र, प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य विकास केंद्र योजना राबविण्यात येत आहेत. सदर योजनेंतर्गत देण्यात येणारे प्रशिक्षण हे पूर्णपणे मोफत असून हे प्रशिक्षण संपूर्ण जिल्ह्यामध्ये देण्यात येणार आहे. या योजनेचा सक्षम




दिव्यांग लाभार्थ्यांनी प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलडाणा कार्यालयाच्या ०७२६२-२४२३४२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त प्र. वा. खंडारे यांनी केले आ

# महात्मा बसवेश्वर चौक ते हिरडव रोड चे रखडलेले काम त्वरित पूर्ण करा :- संतोष पाटील मापारी

**जनसंचलन/ लोणार**

अनेक दिवसांपासून लोणार शहरातील महात्मा बसवेश्वर चौक ते कृषिउत्पन बाजार समिती कडे जाणाऱ्या रस्त्या चे अनेक दिवसांपासून काम थांबलेले आहे त्या रोड च्या बाजूने जे अंतर्गत छोटे रस्ते जातात त्या ठिकाणी सुद्धा कोणत्याच प्रकारचे रस्ते तयार करण्यात आलेले नाही काही ठिकाणी रस्ते उंच तर काही ठिकाणी एकदम उतार झाल्यामुळे अनेक दुचाकी वाहन धारक पदयात्री वृद्ध नागरिक यांना कमालीची कसरत करावी लागत आहे तसेच अनेक जण या अंतर्गत जाणारे रस्ते न केल्यामुळे पडून छोट्या मोठे अपघात होऊन जखमी झाले आहेत तसेच दोन्ही बाजूने अद्यापही पेव्हर ब्लॉक बसवण्यात आलेले नाही तसेच महात्मा बसवेश्वर चौककडून हिरडव रोड कडे वळण



घेतांना खूप मोठा नालीचा खड्डा आहे त्या मध्ये सुद्धा अनेक दुचाकी चारचाकी तसेच एस टी बस त्या मध्ये पडून छोटे मोठे अपघात झाले आहेत तरी या अपूर्ण रस्ताचे काम तात्काळ पूर्ण करावे अन्यथा लोकशाही मार्गानेआंदोलन करण्यात येईल अशी मागणी नगरपरिषद चे सदस्य संतोष पाटील मापारी यांनी केली आहे अनेक दिवसांपासून बंद असलेले काम कधी सुरू होणार कधी सुरू होईल या कडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# बेरोजगार युवक युवतींना रोजगार मिळावा याकरिता उद्योग मंत्री उदय सामंत यांना महेश भैया डोंगरे पाटील यांचे निवेदन

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

मातृ तीर्थ सिंदखेडराजाड येथे जिजाऊ जन्मोत्सव १२जानेवारी निमित्त सिंदखेडराजा येथे आले असतांना छावा जिल्हाध्यक्ष अशोक राजे जाधव यांनी या संदर्भात मराठा नेते महेश भैय्या डोंगरे पाटील यांना निवेदन दिले होते युवक युवतींना बेरोजगारांना रोजगार मिळावा यासाठी एमआयडीसी () उभारून त्यांच्या हाताला रोजगार द्यावा. याकरिता काल दिनांक २८ फेब्रुवारी मुंबई इथे उद्योग मंत्री उदय सामंत यांना मराठा समाजाचे नेते महेश भैया डोंगरे पाटील यांनी निवेदन सादर केले. सदर निवेदनात म्हटले आहे की. मातृतीर्थ सिंदखेड राजा शहराचा स्वतंत्र परिचय देण्याची गरज नाही, परंतु ज्या शहराने स्वराज्याची प्रेरणा दिली तेथील विकासाचा अनुशेष कायमच वाढत चालला आहे. शहरातील विकासाचे अनेक प्रश्न मार्गी लागावे यासाठी आम्ही सरकार दरबारी प्रामाणिक प्रयत्न करीत आहोत. शहर विकासाच्या दृष्टीकोनातून युवक युवतींना बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी तरुण मुलामुलींना त्यांच्या पायावर उभ करण्यासाठी हाताला काम मिळाल्यानंतर नशापाणी पासून प्रवृत्त करण्यासाठी व भावी आयुष्य सुरळीत व चांगले जाण्यासाठी त्यांच्या हाताला काम देणे महत्वाचे आहे. त्याकरिता सिंदखेड राजा शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर एमआयडीसी () उभारून त्यांच्या हाताला रोजगार द्यावा, असे विनंतीपूर्वक निवेदन सादर करण्यात आले. गेल्या जिजाऊ जन्मोत्सव दिनानिमित्त मातृतिर्थ सिंदखेड राजा येथे महेश भैया यांनी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेत.



त्यांनी सिंदखेड राजा येथील बेरोजगार युवकांना व युवतींना रोजगार सिंदखेड राजा नगरीत उपलब्ध करून देईल असे आवाहन. केले होते. त्यासंदर्भात त्यांनी काल उद्योग मंत्री उदय सामंत यांना निवेदन सादर केले. उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याशी सकारात्मक चर्चा करून. मंत्री महोदयांनी संबंधित विषयात जातीने लक्ष देऊन संबंधित विभागाला बैठक लावण्याच्या सूचना दिल्या

# लोणार भाजपा शहर अध्यक्षपदी शुभम बनमेरू यांची निवड

**जनसंचलन/ लोणार**

शहरातील अनेक दिवसा पासून भाजपा पक्षात काम करणारे तरुण तडफदार असे भाजपा चे एकनिष्ठ असे शुभम बनमेरू यांची भाजपा शहर अध्यक्ष पदी भाजपा प्रदेश उपाध्यक्ष मा.आमदार चेनसुख संचेती,आमदार संजयभाऊ कुटे, आमदार श्वेता ताई महाले, मा.आमदार विजयराजजी शिंदे, आमदार आकाशभाऊ फुंडकर, विनोदभाऊ वाघ प्रदेश प्रवक्ते, सचिन देशमुख जिल्हा अध्यक्ष खामगाव यांच्या मार्गदर्शनात जिल्हा अध्यक्ष बुलडाणा गणेशदादा मांटे यांनी नियुक्ती पत्र देऊन निवड केली .नेहमी शहरातील विविध समस्या सोडवण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. त्यांनी अनेक तरुणांना भाजपा पक्षा सोबत जोडून एक मोठी तरुण वर्गाची फळी तयार केली आहे नेहमीच राजकारण सोबत समाजकारणात अग्रेसर असणारे असे तरुण नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे बघितल्या जाते आपला शांत संयमी स्वभाव व पक्षातील जेष्ठ श्रेष्ठ यांच्या मार्गदर्शनात नेहमी ते पक्ष वाढी साठी प्रयत्नशील राहिले आहेत त्यांच्या निवडीने तरुण वर्गा सह भाजपा च्या पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यात आनंदाचे वातावरण आहे.

या वेळी बोलतांना शुभम बनमेरू म्हणाले की मी पक्षा सोबत एकनिष्ठ राहून नेहमी पक्ष वाढी साठी प्रयत्नशील राहिल .नेहमी शहरातील अनेक समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले व तरुण वर्गाला भाजपा सोबत जोडून पक्ष वाढी साठी प्रयन्त केले त्या मुळे माझ्या कामाची पावती म्हणून माझी पक्षाने निवड केली आहे व त्यांनी दाखवलेल्या विश्वासाला तडा न जाऊ देता नेहमी पक्ष वाढी साठी प्रयत्न करून येणाऱ्या २०२४ च्या लोकसभा विधानसभा नगरपरिषद निवडणूक मध्ये विजय खेचून आणण्यासाठी जीवाचे रान करील या वेळी जिल्हाध्यक्ष डॉ गणेश मांटे जेष्ठ नेते विजय मापारी, प्रदेश संयोजक सुधाकर गीते, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष संतोषबापू देशमुख, जिल्हे सचिव गजानन अंकुशराव मापारी, विष्णू डोळे, शुभम देसाई आदी उपस्थित होते.या निवडीमुळे



भाजप पदाधिकाऱ्यामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या नियुक्ती सोबतच शुभम देसाई यांनी अनेक युवकांच्या सोबत भाजपा पक्षात प्रवेश केला शुभम देसाई यांनी एक तरुण वर्गाची फळी तयार केली असून आता त्यांनी भाजप चे कमळ हाती घेतल्याने अनेक तरुण वर्गात आनंदाचे वातावरण आहे.

# पत्रकार क्षेत्रातील नवी आणि सकारात्मक क्रांती घडवणारा माई मीडिया २४ - विधान परिषद उपसभापती नीलमताई गोऱ्हे

## सहकार तत्त्वावर काम करणारे पत्रकारिता क्षेत्रातील पहिले वेब पोर्टल - उद्योगमंत्री उदय सामंत...



वृत्तसंस्था/मुंबई

मीडिया असोसिएशन ऑफ इंडिया अर्थात माई या राष्ट्रीय संघटने अंतर्गत ङ्गमाई मीडिया २४फ या वेबपोर्टलचे उद्घाटन विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आणि उद्योगमंत्री श्री उदयजी सामंत यांच्या शुभहस्ते विधान भवनात संपन्न झाले. याप्रसंगी माई संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्ष शीतल करदेकर , कोषाध्यक्ष चेतन काशीकर, सचिव सचिन चिटणीस उपस्थित होते. या उद्घाटन प्रसंगी विधान परिषदेचे उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यांनी सांगितले की, हा उपक्रम पत्रकार क्षेत्रातील नवी आणि सकारात्मक क्रांती घडवणारा असेल अस म्हणत शुभेच्छा दिल्या. संघटनेच्या अध्यक्षा शीतल करदेकर या आजच्या काळातील रजनी आहेत असे शब्द उच्चारत त्यांचं कौतुक केलं. माई मीडिया २४ हा डिजिटल विश्वातील विश्वसनीय आणि सच्चा पत्रकारितेचे उन्मुक्त माध्यम आहे. जे राजकीय, व्यवसाय, मनोरंजन अशा विविध क्षेत्रातील घडामोडींचे त्वरित आणि योग्य वृत्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी तत्पर राहणार आहे. तसेच सहकार तत्त्वावर काम करणारे पत्रकारितेचे हे पहिलेच डिजिटल माध्यम आहे असे त्यांनी सांगितले. उद्योगमंत्री उदयजी सामंत म्हणाले, माई मीडिया २४ हे सहकार तत्त्वावर काम करणार असणार म्हणून यातून पत्रकारितेत स्थिरता येईल आणि हे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उत्तम मंच ठरेल अशा शब्दात शुभेच्छा दिल्या. या उद्घाटन सोहळ्याला माई मीडिया २४ च्या मुख्य संपादक आणि माई संघटनेचे संस्थापक आणि अध्यक्ष शीतल करदेकर, पोर्टलचे संपादक आणि संघटनेचे संघटन सचिव सचिन चिटणीस, पोर्टलचे उपसंपादक सुरज खरटमल आणि गणेश तळेकर, संस्थापक सदस्य सुनील कटेकर, सल्लागार संतोष भिंगार्डे आणि संजय घावरे उपस्थित होते.

# जिल्ह्यातील तरुण एकवटतोय तरुणांचा रविकांत तुपकरांना मिळतोय जोरदार पाठिंबा...

## निर्धार परिवर्तन यात्रेला शेगाव तालुक्यात मिळाला जोरदार प्रतिसाद...





जनसंचलन/ शेगाव

शेतकरी, कष्टकरी, तरुण आणि सर्वसामान्य जनता आज मोठ्या प्रमाणात निर्धार परिवर्तन यात्रेला प्रतिसाद देत आहेत. गावोगावी मिळणारा हा प्रतिसाद मला लढण्याचे बळ देत आहे. सर्वसामान्य जनतेचे हेच आशीर्वाद आता जिल्ह्यात परिवर्तन घडविणार, असा विश्वास रविकांत तुपकर यांनी शेगाव तालुक्यातील दौऱ्यात बोलतांना व्यक्त केला. तर जिल्ह्यातील तरुण आता एकवटत असून तुपकरांना तरूणांचा जोरदार पाठिंबा मिळत आहे.रविकांत तुपकरांची निर्धार परिवर्तन यात्रा २७ व २८ फेब्रुवारी रोजी शेगाव तालुक्यात होती. या परिवर्तन यात्रेला प्रत्येक गावातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. निर्धार परिवर्तन यात्रा २७ फेब्रु. रोजी शेगाव तालुक्यातील मनसगाव, पहूरपूर्णा, खातखेड, बोंडगाव, भोनगाव, सगोडा, चिंचखेड, भास्तन, डोलारखेड, माटरगाव बु. या गावांमध्ये पोहचली येथे रविकांत तुपकरांनी शेतकऱ्यांच्या, तरुणांच्या व गावातील प्रतिष्ठित आणि ज्येष्ठ नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. अवकाळी पावसाने व गारपीरने झालेल्या नुकसानाची देखील त्यांनी या भागात पाहणी केली. सायंकाळी माटरगाव बु. येथे झालेल्या सभेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तर २८ फेब्रुवारीला सातव्या दिवशी शेगाव तालुक्यातील शिरसगाव, कनारखेड, गायगाव खु., चिंचोली, कालखेड, पाडसुळ, आडसुळ, पाळोदी, मानेगाव व झाडेगाव या गावांमध्ये सुद्धा परिवर्तन यात्रेचा दौरा झाला. या सर्व ठिकाणी रविकांत तुपकरांचे जोरदार स्वागत करण्यात आले. निर्धार परिवर्तन यात्रेला उदंड प्रतिसाद मिळत आहे. मिळणारा हा प्रतिसाद म्हणजे शेतकरी, कष्टकरी, तरुण आणि सर्वसामान्य जनतेचे प्रेम आणि आशीर्वादच आहेत. आता हेच सर्वसामान्यांचे आशीर्वाद जिल्ह्यात परिवर्तन घडवतील याची खात्री आहे, असा विश्वास रविकांत तुपकरांनी बोलतांना व्यक्त केला. अशा भावना देखील तुपकरांनी यावेळी व्यक्त केल्या. खामगाव, संग्रामपूर, जळगाव जामोद व आता शेगाव तालुक्यात निर्धार परिवर्तन यात्रेला मिळणारा प्रतिसाद आता दिवसेंदिवस वाढतच असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

# ग्रामपंचायत भादोला येथे सरपंच पदी ज्योतीताई ठेंग यांची बिनविरोध निवड...



जनसंचलन/बुलडाणा

येथील रिक्त झालेल्या ग्रामपंचायत सरपंच पदाची ग्रामपंचायतची मासिक सभा लावून निवडणूक घेण्यात आली. दिनांक २६ फेब्रुवारी२०२४ रोजी सोमवारी दुपारी २:०० वाजता सभा घेण्यात आली अध्यक्ष पदी टेकाळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली. ग्रामपंचायत चे सर्व सदस्य व उपसरपंच व गावातील काही नागरिक हजर होते यावेळी भादोला येथील सौ. ज्योतीताई सुभाष ठेंग यांची अविरोध पणे निवड करण्यात आली आहे. यावेळी ग्रामविकास अधिकारी घी एस.पी. नेवरे, तलाठी चिंचोले, पोलीस पाटील सुर्यकांत गवई व पोलीस कर्मचारी हजर होते. निवडणूक प्रकीया सुरळीत पार पडली. नवीन झालेल्या सरपंच यांचे सर्वांनी स्वागतही केले.

# भक्ती मार्ग शेतकऱ्याचा बनला डोकेदुखी काही शेतकरी भुमीहीन होणार

जनसंचलन/ चिखली

सिंदखेडराजा ते शेगाव हा जो भक्तिमार्ग बनला आहे त्यामध्ये सिनखेडराजा ते शेगाव या नवीन मार्गांमध्ये बऱ्याच शेतकऱ्यांच्या जमिनी अधिकृत करण्याची सूचना निघाल्याने काही शेतकरी हे भुमीहीन होणार आहेत सदर भक्ती मार्गासाठी याच भागातून अनेक मार्ग आहेत परंतु शासनाच्या आडमुठे धोरणामुळे आमच्या शेतजमिनी घेऊन आम्हाला भूमीहीन व अल्पभूधारक करण्यात येऊ नये असे निवेदन चिखली तालुक्यातील पांढरदेव येथील शेतकरी यांनी चिखली तहसीलचे तहसीलदार यांना एक निवेदन दिले आहे सदर भक्ती मार्ग हा आमच्या जमिनी मधून जात असल्यामुळे या भक्ती मार्गाला विरोध करत आहोत आमच्या पांढरदेव गावातील ४० ते ५० गटातील पिकाऊ व काळी कसदार जमिनीत जात आहेत आधीच आमच्याकडे जमिनी कमी असून त्यातील जमीन अशा रस्त्यामध्ये गेल्यावर अल्पभूधारक तर काही शेतकरी हे भूमीही होण्याची वेळ येणार आहे त्यामुळे आमच्या झोपा उडाल्या असून कुटुंबात भविष्यातील भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे सदर मार्गासाठी आमच्या पिकाऊ जमिनी घेऊ नये या जमिनी घेण्यास आमचा विरोध आहे तरी शासन आणि प्रशासन यांनी आमच्या भावनेचा सहानुभूतीपूर्वक विचार करून आमच्यावर होणारा अन्याय टाळावा आमच्या परिसरांमधून शेगावला जाणारे अनेक पर्याय रस्ते उपलब्ध आहेत व भावीक त्या रस्त्यावरून सुखरूप जात आहेत कोणीही या महामार्गाची मागणी केलेली नाही तरीसुद्धा सदर महामार्ग आमच्या मस्तकी मारण्यात येत आहे मुंबई किंवा दूरदूरच्या लोकांना शेगावला जाण्यासाठी रेल्वे व इतर मार्ग आहेत त्यांचा त्यांचे पाच दहा मिनिटे वाचवण्यासाठी आमच्या काळी कसदार जमीन आमच्यापासून घेऊन आमच्या पुढील पिढीला बरभात करण्यात येवू नये पुढील पिढीच्या कर्तव्यावर गंडांतर आणून नाही असे निवेदन पांढरदेव येथील शेतकरी यांनी चिखली तहसीलचे तहसीलदार साहेब यांना निवेदन दिले आहे सदर निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी साहेब बुलढाणा तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग चिखली यांना सुद्धा पाठवण्यात आले आहे

# सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन...




जनसंचलन/बुलढाणा

दर महिन्यात पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. मार्च महिन्याचा लोकशाही दिन सोमवार, दि. ४ मार्च २०२४ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. तक्रारदारांनी लोकशाही दिनी उपस्थित राहावे, उपस्थित राहणे शक्य नसल्यास तक्रारी रजिस्टर पोस्टाने लोकशाही दिनाआधी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचतील, असे पाठवावे, असे निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी कळविले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958